Impact Factor – 6.625 | Special Issue – 229 (C) | February 2020 | ISSN – 2348-7143

P17

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL

SPECIAL ISSUE 229 (C)

# भारतीय युवक : आव्हाने आणि संधी



- अतिथि संपादक -
डॉ. व्ही. आर. कोडापे

- मुख्य संपादक -
डॉ. धनराज टी. धनगर

- कार्यकारी संपादक -
डॉ. एन. एम. छंगाणी
प्रा. पी. एस. शिरसाट

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

158

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 229 (C) ▪ February 2020 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL**

# भारतीय युवक : आव्हाने आणि संधी

– अतिथि संपादक –

**डॉ. व्ही. आर. कोडापे**

– मुख्य संपादक –

**डॉ. धनराज टी. धनगर**

– कार्यकारी संपादक –

**डॉ. एन. एम. छंगाणी**

**प्रा. पी. एस. शिरसाट**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal ISSN : 234
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 229 (C) : भारतीय युवक : आव्हाने आणि संधी February

# भारतीय युवकांमधील बेरोजगारीचे आव्हान व उपाय

डॉ. गणेश बाबुराव दराडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि. बुलडाणा. मो. ८६९५२५५१००

**प्रस्तावना :-**

भारत हा एक विकसनशील देश आहे. विकसनशील देशात उद्भवणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेता वाढती लोकसंख्या आणि त्यातून वाढती बेरोजगारी. भारत सुद्धा याला अपवाद नाही. वाढती बेरोजगारी ही प्रत्येक देशासाठी एक गंभीर समस्या होत आहे. त्यामुळे अमेरिकेसारख्या प्रगतीशिल देश बेरोजगारीचे प्रमाण वाढले की सरकारची डोकेदुखी पण वाढत असते. भारतातील मात्र बेरोजगारीचे चित्र भयावह आहे. भारत म्हणजे जगातील सर्वाधिक बेरोजगारीचे जणू एक डबके आहे. २०१९ च्या आक्टोबर मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ६.९ टक्के होता. २०१४ मध्ये बेरोजगारांची भारतातील संख्या १४ कोटी होती ती २०१९ मध्ये ३० कोटी झाली. यामुळे अर्थव्यवस्था बेरोजगारांना का सामावून घेऊ शकत नाही याबाबत आश्चर्यभाव निर्माण झाला तर नवल नाही.

प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील युवकांच्या संदर्भात बेरोजगारीची कारणे तर दिली आहेतच शिवाय बेरोजगारीचे हे आव्हान पेलण्यासाठी उपाय सुचविले आहेत.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१. भारतातील युवकांच्या संदर्भात बेरोजगारीची कारणे अभ्यासणे.

२. युवकांच्या संदर्भात बेरोजगारी दूर करण्यासाठी उपाय सूचविणे.

**बेरोजगारी आणि सुशिक्षित बेरोजगारी :-**

प्रचलित वेतनावर काम करण्याची तयारी असून देखील जेव्हा काम मिळत नाही तेव्हा त्याला बेरोजगारी असे म्हणतात. आधुनिक काळात आणि भारतात औद्योगिक क्रांतीनंतर सुशिक्षित, उच्च शिक्षित युवकांना रोजगार मिळत नाही. काम करण्याची क्षमता असूनही त्या व्यक्तीला काम मिळत नसेल तर त्याला बेरोजगारी असे म्हणतात.

ज्या बेरोजगारांच्या हाताला काम हवे आहे, जे कष्ट करण्यास उत्सुक आहेत अशांचा सातत्याने भ्रमनिरास होत ओ. यामुळे त्यांच्यावर गंभीर मानसिक परिणाम होत असून त्याचे व्यष्टीकरण विभिन्न प्रकारे होत आहे.

रोजगारक्षम युवक नसावेत म्हणजे नेमके काय तर सरळ आपली युवापिढी शैक्षणिक दृष्ट्या कालबाह्य झाली आहे. लाखोंच्या फीज भरुन डिग्री घ्यायच्या नंतर अॅडवान्स केक्निल कोर्सेस पैसे मोजायचे. मात्र अॅडव्हान्स काय असतं ते कधीच शैक्षणिक अभ्यासक्रमात आणणार नाहीत. चौका चौकात जशी हॉटेल टाकावीत तशी मोठमोठ्याल्या शैक्षणिक संस्था काढल्या. त्या संस्थांच्या शाळा कॉलेजचे मळे पिकवले. नुसतेच भव्यदिव्य टॉस! शिक्षणाच्या, सुविधांच्या नावाने बोंब. एकूण शिक्षणव्यवस्था ही एकमेव अनस्किल्ड अँन्ड अनएल्प्यॉयेबल तरुण तय्यार करायची फॅक्टरी झाली आहे. कला, वाणिज्य आणि शास्त्र या शाखेतून पदवीधर तरुण कायम हालापेष्टा सहन करत असतात नोकरीसाठी. इंडस्ट्रीला काय पाहिजे ते आपली शिक्षणव्यवस्था पुरवू शकत नाही. ही काळ्या दगडावरची रेघ आहे. सरकारने जर नोकरीच्या संधी निर्माण केल्या तर बेरोजगारी कमी होऊ शकते ते आता ह्या संधी सरासरी असूच शकत नाहीत कारण मिनिमम गव्हर्नमेंट आणि मॅक्सिमम गव्हर्नन्स असा भाजपाचा अजेंडा पहिल्यापासूनच आहे. सरकारने स्वयंरोजगारासाठी कितीही योजना राबवल्या तरी लालफितीच्या कारभारात त्या यशस्वी होत नाहीत आणि होणारही नाहीत. कारण भारतीयांची मानसिकता. मुद्रा लोन वैगेरे योजनेत कर्ज मिळवण्यासाठी काय काय हाल सोसावे लागतात हे जाणकारांना चांगलेच माहितच आहे. उगाचंच आकड्यांचा खेळ करुन भाजपाने कितीही आकापिक केला तरी जनता आणि भडकलेला तरुण मतपेटीतून राग व्यक्त करायला कायमच दक्ष आहे. जे फुकाळ दक्ष वा संघटना जातीपातीत विष कालवून स्वार्थ साधू इच्छितात त्यांच्यावर जनता कधीच विश्वास ठेवणार नाही.

सरकारने जर शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल केले तरच रोजगारक्षम युवा तयार होतील. पण बदल झाला तर आपल्याला सोयीनुसारच झाला पाहिजे असं भारतातल्या सगळ्याच राजकारणी नेत्यांना वाटतं. त्यामुळे तरुणांनी आत्मपरीक्षण करुनच शैक्षणिक विकल्प निवडले पाहिजेत. सुशिक्षित बेरोजगारांनी आपण नेमंक पुरोगामी पडतोय आणि कोणत्या बाबतीत सुधारणा करणे गरजेचे आहे. यावर लक्ष केंद्रित करायची गरज आहे. आरक्षण, मोर्चे, आंदोलने, रॅली वगैरे या गोष्टी कित्येक वर्षे चालू होते आणि सोकॉल्ड लोकशाहीत पुढची अनेक वर्षानुवर्षे हेच चालू राहणार आहे. अशा भानगडीत पडून कधीच कोणाचा विकास वा प्रगती होत नाही. गेल्या बहात्तर वर्षांपासून आपण केवळ शिक्षण, रस्ते, वीज, पाणी, गरीबी वैगेरे यावर लढतोय आणि आपल्यासाठी लढणारे (फुकटचा आव आणून) राजकारणी नेते, समाजसेवक वगैरे (काही अपवादात्मक पुढारी वगळता) धनिष्ठ, गल्लेलठ्ठ होतात. म्हणून युवकांनी सूज्ञ व्हावे.

**बेरोजगारीची कारणे :-**

भारतात बेरोजगारी फोफविण्यास अनेक बाबी कारणीभूत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर स्थिर नाही हे प्रमुख कारण असून यालाही काही बाबी कारणीभूत आहेत. गुंतवणूकीचा न्युन दर आणि ज्यादा रोजगार संधी निर्माण करणाऱ्या उत्पादन क्षेत्राच मंद वृद्धी दर, उत्पादनाच्या औद्योगिक निर्देशांकामध्ये उत्पाद वृध्दीदेखील समाविष्ट असते. औद्योगिक आणि पायाभूत सोयींच्य क्षेत्रातील, विशेषत: बांधकाम, क्षेत्रातील मंदी, आणि माहिती तंत्रज्ञा